# दिनांक 16/11/2013 रोजी नांदेड येथ झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतील मुद्याबाबत कार्यवाहीचा अनुपालन अहवाल.

| अ.क्र. | बैठकीतील मुद्या | केलेली कार्यवाही |
|---|---|---|
| 1) | जिल्हा परिषद, अध्यक्ष, मा.दिलीप पाटील बेटमोगरेकर यांनी बैठकीत असे नमुद केले की, नवीन बांधण्यात आलेल्या नियोजन भवनातील मुख्य सभागृहास भारताचे माजी गृहमंत्री, भारत सरकारच्या नियोजन आयोगाचे माजी उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै.डॉ.शंकरराव चव्हाण साहेबांचे नाव देण्यात यावे आणि सभागृहात त्यांचे तैलचित्र लावण्यात यावा, असा ठराव मांडला. या ठरावासव उपस्थितीत सर्व मा.खासदार/आमदार/जि.प.अध्यक्ष महोदयांनी अनुमोदन दिले आणि सभागृहात एकमताने ठराव मान्य करण्यात आला. यावर मा.अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती महोदयांनी असे सुचित केले की, पुढील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीपर्यंत सभागृहाचे नामकरण व तैलचित्र लावण्याच्या सुचना दिल्या. | जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड परिसरातील नियोजन भवनातील सभागृहामध्ये कै.डॉ.शंकररावजी चव्हाण यांचे तैलचित्र व नियोजन भवन इमारतीचे नामकरण फलक बसविणे या कामांचे अंदाजपत्रकास दिनांक 31/01/2014 रोजी रु.7.60 लक्षच्या कामास प्रशासकीय मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तैलचित्र व नामकरण फलक बसविण्याचे काम लवकरच पुर्ण करण्यात येईल, असे कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, नांदेड यांनी कळविले आहे. |

| अ.क्र. | बैठकीतील मुद्दा | केलेली कार्यवाही |
|---|---|---|
| 2) | मा.खा.श्री.सुभाष वानखेडे यांनी असे नमुद केले की, किनवट हा तालुका अतिदुर्गम भाग असल्यामुळे किनवट व माहूर नगरपालिकेकडे जे काम प्रलंबित आहेत. त्याकडे लक्ष देऊन निकाली काढण्याबाबत सांगितले. माजी मुख्यमंत्री मा.श्री.अशोकरावजी चव्हाण साहेब यांनी सभागृहात असे निर्देश दिले की, माहूर, अर्धापूर या नविन नगरपंचायतीमध्ये बरीच पदे रिक्त आहेत. याबाबत पदे भरण्याकरीता बिंदु नामावली मंजूर करुन आणुन पद भरती करण्यात यावी. याबाबत शासनाकडे नियमांतर्गत विशेष सुट मागण्यात येऊन पद भरण्यात यावेत, असे सुचविले.<br><br>नगरपालिका/ नगरपंचायती रिक्त पदाबाबत चर्चा होत असतांना कुंडलवाडी, नगरपालिकेमध्ये 25 पदे मंजूर असुन 2 पदे भरलेली असल्याचे जि.नि.स.,सदस्य, श्री.के.बी.रेड्डी यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणुन दिले. यावर माजी मुख्यमंत्री मा.श्री.अशोकरावजी चव्हाण यांनी असे निर्देश दिले की, सर्व नगरपालिकेतील रिक्त पदाचा आढावा घेवुन जी पदे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्तरावर भरावयाची आहेत ती वर्ष अखेर भरण्यात यावी, ज्या पदांना शासनाची मंजूरी लागते त्यासाठीचा प्रस्ताव तयार करुन खास दुतामार्फत शासनास सादर करावा आणि मंजूरी घेण्यासाठी पाठपुरावा करुन पदे भरण्याबाबत सुचना दिल्या.<br><br>मा.आ.श्री.शंकरअण्णा धोंडगे यांनी असा प्रश्न उपस्थित केला | वर्ष 2013-14 मध्ये अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटीकरण योजने अंतर्गत प्राप्त प्रस्तावानुसार 4 नगर परिषदांना 203.00 लक्ष निधी वितरीत करण्यात आला. धर्माबाद रु.18.80 लक्ष, उमरी रु.45.00 लक्ष, भोकर रु.50.00 लक्ष, मुदखेड रु.90.00 लक्ष, नागरोत्थान योजने अंतर्गत 6 नगर परिषदांना रु.142.00 लक्ष निधी वितरीत करण्यात आला. मुदखेड, भोकर, हदगाव, अर्धापूर व माहूर यांना प्रत्येकी रु.25.00 लक्ष व बिलोली नगर परिषदेस रु.17.00 लक्ष देण्यात आले. नागरी दलित योजने अंतर्गत 7 नगर परिषदांना रु.170.00 लक्ष वितरीत करण्यात आले. उमरी, कुंडलवाडी, हदगाव, माहूर यांना प्रत्येकी रु.20.00 लक्ष आणि देगलूर, भोकर, अर्धापूर यांना रु.30.00 लक्ष वितरीत करण्यात आले.<br><br>किनवट नगर परिषदेला आदिवासी योजनेतुन रुपये 40.00 लक्ष प्रस्तावित करण्यात आले होते परंतु 31 मार्च अखेर त्यांनी परिपुर्ण प्रस्ताव दिला नाही. किनवट व माहूर नगर पालिकेकडे जी काही प्रलंबित प्रकरणे होती ती मुख्याधिकारी आढावा बैठकीपुर्वी निकाली काढण्यात आले सद्या प्रलंबित प्रकरणे नाहीत.<br><br>जिल्ह्यातील नगरपालिका मधील राज्यस्तरीय रिक्त पदांचा आढावा घेऊन दिनांक 09/02/2014 रोजी रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | की, कंधार नगरपालिकेचे प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविले असता प्रकल्प अधिकारी, नगरपालिका प्रशासन, नांदेड मंजूरी देण्यास टाळाटाळ करतात. याबाबत प्रकल्प अधिकारी, नगरपालिका प्रशासन यांनी असे सांगितले की, उमरी, मुदखेड, अर्धापूर या तीन नगरपालिका सोडुन कोणत्याही नगरपालिकेचे प्रस्ताव तांत्रिक मंजूरीसह प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे पुढील कार्यवाही करता आलेली नाही. यावर माजी मुख्यमंत्री मा.श्री.अशोकरावजी चव्हाण यांनी नगरपालिका प्रशासनाच्या कामावर नाराजी व्यक्त करुन याबाबत सर्व नगरपालिकांची बैठक घेवुन डिसेंबर अखेर पर्यंत पूर्ण कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या. | सर्व नगर परिषदे कडून दिनांक 30/11/2013 रोजी असलेले रिक्त पदाबाबत माहिती बोलाविण्यात आली आहे. ज्या मुख्याधिका-यांचे आस्थापना खर्च शासनाने दिलेल्या मर्यादेपेक्षा कमी असून बिंदू नामावली मंजूर करून घेण्यात आली आहे, त्या नगर परिषदांना लोकसभा सार्वत्रिक निवडणुकाचे आदर्श आचारसंहिता संपल्या नंतर जिल्हा निवड मंडळाकडे परिशिष्टमध्ये माहिती भरून प्रस्ताव सादर करण्याचे सुचना देण्यात आले आहे.<br><br>कुंडलवाडी नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांनी सांगितले की, त्यांचे आस्थापना खर्च 60% मर्यादेपेक्षा जास्त असल्यामुळे पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आली नाही.<br><br>नगर परिषद मुख्याधिका-यांची सर्व प्रलंबित प्रकरणांचा आढावा बैठक घेण्यात आली. माहे डिसेंबर अखेर पर्यंत 90% पेक्षा जास्त प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे. त्रुटी असलेल्या प्रकरणांमध्ये मुख्याधिका-यांना पुढील बैठकीपर्यंत त्रुटी पूर्ण करुन मा.जिल्हाधिकारी यांना समक्ष भेटुन फेर प्रस्ताव देण्याबाबत व झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या, असे प्रकल्प अधिकारी, नगर पालिका प्रशासन, नांदेड यांनी कळविले आहे. |

| अ.क्र. | बैठकीतील मुद्दा | केलेली कार्यवाही |
|---|---|---|
| 3) | जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन येथील अपातकालीन केंद्र (डिजास्टर मॅनेजमेन्ट सेंटर) स्थापन करण्याबाबतच्या विषयावर चर्चा करतांना माजी मुख्यमंत्री मा.श्री.अशोकरावजी चव्हाण साहेब यांनी असे नमुद केले की, तीन जिल्ह्याचे विभागीय डिजास्टर मॅनेजमेन्ट सेंटर स्थापन करण्यासाठी केंद्र शासनांच्या गृह मंत्रालयाकडे प्रस्ताव सादर करावा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी सल्लागार संस्थेची मदत घेऊन प्रथम आराखडा तयार करुन घ्यावा आणि परिपुर्ण प्रस्ताव केंद्र शासनास सादर करावा, असे निर्देश दिले. यावेळी मा.खा.श्री.सुभाष वानखेडे यांनी सदर प्रस्ताव राज्यस्तरावरुन केंद्र शासनाकडे पाठविल्यास त्याबाबत आपण मंजूरीसाठी केंद्र शासनाकडे प्रयत्न करु, असे सांगितले. | उपरोक्त अपातकालीन केंद्र (डिजास्टर मॅनेजमेन्ट सेंटर) रु.10.00 कोटी चा प्रस्ताव पत्र क्र.5551 दि.15/05/2014 अन्वये मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांना सादर.<br><br>या ठिकाणी असे सादर करण्यात येते की, आपत्ती व्यवस्थापन कायद्याप्रमाणे नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यासाठी मनपा, नांदेड वाघाळा महापालिका ही संस्था नोडल यंत्रणा असल्यामुळे उपरोक्त प्रकल्प मा.आयुक्त, मनपा नांदेड वाघाळा महापालीका यांच्याकडुन कार्यान्वीन होण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी विनंती केली आहे. |
| 4) | एम.आर.ई.जी.एस. (M.R.E.G.S.) अंतर्गत झालेल्या कामामध्ये कलम 156 (3) अंतर्गत अधिकारी/ कर्मचा-यावर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. याबाबत चर्चा होत असतांना माजी मुख्यमंत्री मा.श्री.अशोकरावजी चव्हाण यांनी असे सुचना दिल्या की, जिल्ह्यामध्ये गुन्हे दाखल होत असल्याने अधिकारी/ कर्मचारी काम करायला तयार नाहीत. त्यामुळे मा.पालकमंत्री महोदयांनी जिल्हा पोलिस अधिक्षक व संबंधित अधिका-यांची बैठक आयोजित करुन याबाबत आवश्यक तो निर्णय घ्यावा. | नजीकच्या कालावधीत लोकसभेची आदर्श अचारसंहिता असल्याने बैठकीचे आयोजन करण्यात आलेले नाही, परंतु सद्यस्थितीत अचारसंहिता शिथील झाल्याने मा.पालकमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पोलीस अधिक्षक व सर्व अधिकारी/ कर्मचारी यांची बैठक लवकरच घेण्यात येईल, असे उपजिल्हाधिकारी (मग्रारोहयो), नांदेड यांनी कळविले आहे. |

| अ.क्र. | बैठकीतील मुद्दा | केलेली कार्यवाही |
| --- | --- | --- |
| 5) | रस्ते विकासावर चर्चा होताना निधी वाढवा परंतु रस्त्याच्या कामांची गुणवत्ता सांभाळली जात नाही, असे मत मा.खा.श्री.सुभाष वानखेडे यांनी व्यक्त केले. एका किलोमीटरसाठी रु.1.00 कोटी हा कोणता डी.एस.आर. (DSR) आणला. राष्ट्रीय महामार्गापेक्षा जास्त खर्च प्रजिमाच्या रस्त्यावर केला जातो. तरी तो रस्ता मजबुत करण्यात येत नसल्याचे बैठकीत नमुद केले. | सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन कार्यान्वीत करण्यात येणा-या रस्त्यांच्या कामांची गुणवत्ता राखली जाते. नांदेड जिल्हा दरसुची ही महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे तयार करण्यात आली असुन दरसुचीतील दर हे इतर जिल्ह्याच्या तुलनेत जवळपास सारखीच आहे, असे कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, नांदेड यांनी कळविले आहे. |
| 6) | माजी मुख्यमंत्री मा.श्री.अशोकरावजी चव्हाण साहेबांनी असे सांगितले की, रस्त्यांच्या कामांची गुणवत्ता ठेवलेली नाही, हे सत्य आहे. नांदेड/भोकर रस्त्यासाठी 20 ते 22 कोटी मिळाले. सहा महिन्यामध्ये रस्ता खराब झालेला आहे तसेच नांदेड-हदगांव, नांदेड-लातुर या रस्त्याच्या कामांची चौकशी झाली पाहिजे. तसेच पंतप्रधान ग्रामसडक योजना केंद्रीय राखीव निधी (सीआरएफ) या योजनेअंतर्गत जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभागांच्या झालेल्या कामांची चौकशी झाली पाहिजे. या योजनेअंतर्गतच्या कामांची यादी चौकशीसाठी मा.सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठविण्याचे निर्देश दिले. | नांदेड-भोकर ही लांबी राष्ट्रीय महामार्ग विभाग नांदेड यांच्या अखत्यारित देखभाल दुरुस्तीसाठी कार्यान्वयीत आहे. सन 2013-14 या वर्षात नांदेड ते भोकर या लांबीत एकूण पाच कामे प्रगतीत होती, त्यापैकी काही कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. दरम्यानच्या काळात भोकर शहरातुन जाणा-या लांबीमध्ये नगरपरिषद, भोकर यांनी इलेक्ट्रीकल पोलचे व लाईनचे काम, रस्त्याच्या मधोमध केल्यामुळे व त्याच कालावधीत सततच्या पावसामुळे पाण्याचा निचरा न झाल्यामुळे रस्त्याचा पृष्ठभाग काही ठिकाणी खराब झालेला होता.<br><br>पावसाळ्यानंतर रस्त्याचा नादुरुस्त झालेला पृष्ठभाग संबंधित ठेकेदाराकडुन पुर्ववत करुन घेण्यात आलेला आहे. आज रोजी रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत असुन वाहतुक सुरळीत सुरु आहे. राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत केल्या जाणा-या रस्त्याची कामे ही चांगल्या दर्जाची केली जातात, असे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग |

| | | |
|---|---|---|
| | | विभाग, नांदेड यांनी कळविले आहे.<br><br>नांदेड-लातुर हा रस्ता प्र.रा.मा.-2 व 3 दर्जाचा आहे. हा रस्ता सा.बां.विभाग, नांदेडच्या कार्यक्षेत्रात येतो. सदर रस्ता सुरळीत वाहतुकी योग्य आहे, असे कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.नांदेड यांनी कळविले आहे.<br><br>पंतप्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत कामांची तपासणी करणे करिता वेळोवेळी राज्य गणुवत्ता समन्वयक यांना कामांच्या प्रगतीप्रमाणे या विभागामार्फत कामांची यादी पाठविण्यात येत आहे व राज्य गुणवत्ता समन्वयक यांच्यामार्फत कामांची तपासणी करण्याकरिता राज्य गुणवत्ता निरिक्षक यांची नेमणुक केली जाते तसेच या प्रमाणे कामांच्या विविधस्तरावर राष्ट्रीय गुणवत्ता निरिक्षक तपासणी करण्याकरिता या विभागांतर्गत कामांची यादी राज्य गुणवत्ता समन्वयक यांच्यामार्फत राष्ट्रीय गुणवत्ता समन्वयक यांना पाठविली जात आहे, असे कार्यकारी अभियंता, (प्रमंग्रासयो), म.ग्रामीण रस्ते विकास संस्था, नांदेड यांनी कळविले आहे.<br><br>नांदेड-भोकर, नांदेड-हदगांव, नांदेड-लातुर प्रधानमंत्री ग्राम सडक योजना आणि केंद्रीय राखीव निधी (सिआरएफ) योजनेंतर्गत जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभगाकडे उपलब्ध करुन दिलेल्या निधीतुन घेण्यात आलेल्या कामांची चौकशी करण्याबाबत या कार्यालयाने दिनांक 27/12/2013 अन्वये मा.सचिव (रस्ते) |

| | | |
|---|---|---|
| | | सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविले आहे. <br><br> सचिव (रस्ते), सा.बां.विभाग, मंत्रालय यांना चौकशीची कार्यवाही हाती घेण्यासाठी त्यांचे पत्र क्र.704 दिनांक 20/01/2014 अन्वये कळविण्यात आले आहे. तसेच सन्माननीय सदस्य मा.खा.श्री.सुभाषराव वानखेडे व माजी मुख्यमंत्री मा.श्री.अशोकराव चव्हाण यांना पत्र क्र.705 दिनांक 20/01/2014 च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे, असे अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, नांदेड यांनी कळविले आहे. |
| 7) | अंबुलगा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे, त्याबाबत लोक कोर्टात जाणार आहेत, असे मत मा.आ.श्री.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी व्यक्त केले. | सन 2013-14 या वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अंबुलगा या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले असुन सदर रस्त्यावर वाहतुक सुरळीत पणे चालु आहे, असे कार्यकारी अभियंता, (बांधकाम) दक्षिण विभाग, जि.प. नांदेड यांनी कळविले आहे. |
| 8) | आब्दुल्लापुरवाडी रस्ता खराब झाल्याबाबत मा.आ.श्री.वसंतराव चव्हाण यांनी प्रश्न उपस्थित केला. यावर कार्यकारी अभियंता यांनी या रस्त्यावर ट्राफीक जास्त असल्यामुळे रस्ता खराब झाला असल्याचे सांगितले. यावर मा.अध्यक्ष,जि.नि.स.महोदयांनी याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या. | सदरील रस्त्याचे मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्यात आलेले आहे. मुळ मंजूर अंदाजपत्रक Pavement Design Specisication 20 प्रमाणे प्रति दिवस 42 वाहने करिता करण्यात आले होते. रस्त्याचे काम पुर्ण झाल्यावर वाळू वाहतुक वर्दळ वाढल्यामुळे प्रति, दिवस 402 वाहने जात आहे व रस्त्याचा पृष्ठभाग खचून जात आहे. याबाबतचा अहवाल अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, नांदेड यांना सादर करण्यात आलेला आहे व पुढील कार्यवाही प्रगती पथावर आहे, असे कार्यकारी अभियंता, (प्रमंग्रासयो), महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नांदेड यांनी कळविले आहे. |

| अ.क्र. | बैठकीतील मुद्या | केलेली कार्यवाही |
|---|---|---|
| 9) | बेटक बिलोली मुक्तापुर रस्ता केव्हा चालु करणार? असे विचारले असता लवकरच रस्ता चालु करणार असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले. | नायगांव बेटक बिलोली मुस्तापुर या रस्त्याचे काम मंजूर निविदेच्या अटी दोषनिवारण कालावधी अंतर्गत संबंधित ठेकेदारामार्फत करण्यात येत आहे, असे कार्यकारी अभियंता, (प्रमंग्रासयो), महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नांदेड यांनी कळविले आहे. |
| 10) | माजी मुख्यमंत्री मा.श्री.अशोकरावजी चव्हाण साहेबांनी असे निर्देश दिले की, प्रत्येक मतदारसंघात किमान दहा-दहा रस्त्यांच्या कामांना कार्यकारी अभियंता यांनी भेटी देऊन कामांची गुणवत्ता तपासुन अहवाल सादर करावा, अशा कामांचे प्रत्येक मतदारसंघात 2-3 कामे निवडुन थर्ड पार्टीकडुन मुल्यामापन क्रास चेकींग करावी आणि चौकशी अंती जो निकष निघेल त्यानुसार संबंधितावर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | 1. प्रत्येक मतदार संघातील 10 पेक्षा जास्त कामे तपासली असुन झालेल्या कामांचा गुणवत्तेचा दर्जा चांगला राखण्यात येत आहे. यापुढे त्रयस्थ पार्टीकडुन तपासण्या करुन गुणवत्तेबाबत खातरजमा करण्यात येईल, असे कार्यकारी अभियंता, (बां) दक्षिण व सा.बां.वि. नांदेड यांनी कळविले आहे.<br>2. नियोजन विभागाकडुन निविदा प्रक्रीयातुन त्रयस्थ संस्था नियुक्त करुन कामांची तपासणी करण्यात येईल. |
| 11) | नागपूर-बोरी-पार्डी-तुळजापुर महामार्गावर बांधण्यात आलेल्या भुयारी मार्गाचे अर्धवट बांधकामामुळे अपघाताचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात वाढले असल्याने पाडुन दुरुस्ती करण्याचे सन्माननीय सदस्या सौ.वंदना लहानकर यांनी सभागृहात नमुद केले. याबाबत संबंधित अधिका-यांनी तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करण्याचे सुचना मा.अध्यक्ष, जि.नि.स.महोदयांनी दिल्या. | नागपूर-बोरी-पार्डी-तुळजापुर महामार्गावर बांधण्यात आलेल्या भुयारी मार्गाबाबत सुचनेप्रमाणे कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे व सद्यास्थितीत वाहतुक वर्दळ सुरळीत आहे, असे कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, नांदेड यांनी कळविले आहे. |

| अ.क्र. | बैठकीतील मुद्या | केलेली कार्यवाही |
|---|---|---|
| 12) | कुदळा मध्यम प्रकल्प उमरी प्रकल्पाच्या कॅनॉलची दुरुस्ती करुन पाणी लवकर सोडण्यात यावे, अशीही मागणी सन्माननीय सदस्यांनी केली. | कुदळा मध्यम प्रकल्प ता.उमरी च्या कालव्याची दुरूस्ती करून कालव्यास पाणी सोडण्यात आले असून त्या प्रकल्पावर रब्बी हंगाम यशस्वीपणे राबविण्यात आला आहे, असे कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड यांनी कळविले आहे. |
| 13) | बैठकीत चर्चा होत असतांना मा.अध्यक्ष, जि.नि.स.महोदयांनी माहूर येथे तलावात पडुन 4 व्यक्ती मृत झाल्या, अशी जी दुर्घटना घडली तशी दुर्घटना पुन्हा घडु नये, यासाठी तलावातील शेवाळे काढणे, फरशी दुरुस्त करणे व इतर आवश्यक कामे करण्याबाबत निर्देश दिले. | पुरातत्व विभागाकडुन रु.2.00 कोटी खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले असुन सदर अंदाजपत्रक फोर्ट्स सल्लागार मार्फत अंतिम करुन श्रीक्षेत्र माहुरगड विकास प्राधिकरणांतर्गत नैसगिक व सांस्कृतीक पुरातन स्थळांच्या विकासाचा आराखडा शासनास सादर करण्यात येईल आणि निधी उपलब्ध होताच काम हाती घेण्यात येईल. |
| 14) | माजी मुख्यमंत्री मा.श्री.अशोकरावजी चव्हाण साहेबांनी सभागृहात असे निर्देश दिले की, मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी नांदेड येथे आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णय दिलेला आहे. मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्णयानुसार 3 महिन्याच्या आत निर्णय घेण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार महसुल विभागांने कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या. | मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक 23/09/2013 रोजी अंतिम आदेश पारित करुन मंत्रीमंडळाने दिनांक 05/01/2009 रोजी नांदेड येथे नविन महसुल विभाग (विभागीय आयुक्तालय) निर्माण करण्याचा घेतलेला निर्णय महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 मधील कलम 4(4) या तरतुदीनुसार कायदेशीर असलेबाबत अभिप्राय नोंदविलेला आहे. मा.उच्च न्यायालयाने पुढे असेही आदेशित केले आहे की, नविन महसुल विभाग निर्माण करणेबाबतचा राज्य शासनाचा निर्णय हा चार वर्षापूर्वीचा असल्यामुळे नविन विभागीय आयुक्तालय निर्माण करण्यासंबधाने |

| | | |
|---|---|---|
| | | आवश्यक ती कार्यवाही या आदेशाच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत सुरु करावी, असे आदेशित केले आहे असल्याचे कळवून या प्रकरणात उचित कार्यवाही करण्यासाठी आदेशाची प्रत मा.अपर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दिनांक 18/02/2013 अन्वये सादर करण्यात आले आहे. |